करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२४ | पाने-१२ | दि.२८/०६/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106
www.saptahiksandesh.com

मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी...!
प्रोप्रा.अमोल ढवळे मो.९८५०१२५५६१
शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

आयकॉन स्टील व सिमेंटचे अधिकृत विक्रेते
PARAS Group of Industries

आमच्याकडे नामांकित कंपनीचे स्टील, सिमेंट, सनला, पत्रे, चैनल, पाईप, क्रशसॅन्ड व खडी तसेच बांधकामासाठी लागणारे मटेरीयल होलसेल दरात मिळेल.
पत्ता : बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा

# तालुक्यात कडधान्याची पेरणी सरासरीच्या अडीचपट

## सर्वात जास्त उडीदची पेरणी - ऊस लागवड घटली

करमाळा : यावर्षी तालुक्यात वेळेवर पाऊस झाल्याने खरीपाच्या पेरणीत मोठी वाढ झाली आहे. तूर, उडीद, मुग आदी कडधान्यात सरासरीच्या अडीचपट पेरणी झाली आहे. यात सर्वात जास्त उडीद या पीकाची पेरणी झाली आहे.

तालुक्यामध्ये कडधान्याची सरासरी पेरणी १२,६९४.४ हेक्टर होत असते. यावर्षी ३०,७१६ हेक्टर म्हणजे २४१.९६ टक्के पेरणी झाली आहे. यात उडीद १९,०५१., तूर ११,४०५., मुग २६० हेक्टर अशी पेरणी झाली आहे. तृणधान्यामध्ये मकाची सर्वात जास्त म्हणजे ६,७९२ हेक्टर तर बाजरीची ४५८ हेक्टर पेरणी झालेली आहे. अडसाली ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात घटली आहे. अडसाली ऊसाची लागवड सरासरी १६,१२० हेक्टर अशी असताना यावर्षी फक्त १५४५ हेक्टरवर ऊसाची लागवड ९.५८ टक्के झाली आहे. शेतकरी ऊसापेक्षा केळी आणि इतर पिकांवरती



लक्ष देत असल्याचे दिसून येत आहे. याप्रमाणेच गळीत धान्याची लागवडही खूप कमी झाली आहे. भुईमूग ४६ हेक्टर तर सुर्यफूल ३५८ हेक्टर व सोयाबीन ४४ हेक्टर इतकीच लागवड झाली आहे. चारा पीकांमध्ये मका १५३८ हेक्टर तर कडवळ ११२४ हेक्टरवर लागवड झालेली आहे. फळपीका मध्ये केळीची १९४५ हेक्टर तर भाजीपाल्याची २०११ हेक्टरमध्ये लागवड झालेली आहे.



यावर्षी पाऊस चांगला झालेला असल्याने बऱ्याच वर्षांनी खरीपाची मोठ्या प्रमाणात पेरणी झालेली आहे. तर काही ठिकाणी अद्यापही पेरणी सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नगदी पिकाचे नियोजन करणे आवश्यक आहे.तसेच खते व औषधे हे अधिकृत दुकानातून खरेदी करावेत व खरेदी केलेल्या मालाची पावती घ्यावी. बियाणे अथवा खते औषधाबाबत तक्रार असल्यास पंचायत समितीच्या कृषी कार्यालयाकडे किंवा तालुका कृषी कार्यालयात तक्रार नोंदवावी. कीड रोगाबाबत गावागावात जाऊन कृषी सहाय्यक शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा. शेतीच्या पीकाबाबत १ जुलै पासून सर्व्हेक्षण केले जाणार आहे. ...संजय वाकडे (तालुका कृषी अधिकारी)

Reg No : F-31904
ईशा पॅरामेडिकल अॅन्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, करमाळा.
Affiliated By :- Engineering & Management Institute of India Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21363)

इंजिनिअरींग व टेक्नीकल क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !
Eligibility for Technical Courses
Duration : 3 years (6 Semester),
Qualification : 10th or Eq.
Duration : Lateral Entry 2 yrs. (4 Semester)
Qualification : 12th PCM / ITI
ADMISSION OPEN

- Diploma in Civil Engineering
- Diploma in Computer Eng.
- Diploma in Electrical Eng.
- Diploma in Computer Science
- IT & Management

आरोग्य क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !
ADMISSION OPEN
Affiliated By :- Lal Bahadur Shastri Paramedical Council Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21267)

Eligibility For Paramedical Courses
Qualification : 12th Science
- Optometry
- D.M.L.T.
- Diploma in Sanitary Inspector
- Diploma in X-ray Technician
- Diploma in Dialysis Technician
- All Paramedical Course Available

कॉलेजची खास वैशिष्ट्ये : ● सुसज्ज इमारत ● तज्ञ शिक्षक वृंद ● प्रॅक्टीकलसाठी लॅब ● १००% जॉब प्लेसमेंट
■ शिष्यवृत्ती योजना उपलब्ध
■ लिमिटेड सीट तरी आजच आपला प्रवेश निश्चित करा !
पत्ता : सोलंकर बिल्डींग, नगर रोड, बायपास, मॉडर्न जिम, २ रा मजला, करमाळा (९९७०९३०१५३, ९७३००३३१२४)

इतरांचे अनुकरण म्हणजे स्वत:वर हल्ला होय...!

संपादकीय..........................................!

# जीवनशैली

समाजात प्रत्येकाला सर्व गोष्टी मिळतातच असे नाही,. पण प्रत्येकाला काही ना काही वेगळेपण दिलेले असते ते समजले पाहिजे. त्यासाठी एक रूपक आहे.

"कंठ दिला कोकीळेला, पण रूप काढून घेतले
रूप दिले मोराला, पण इच्छा काढून घेतली
इच्छा दिली मानवाला, पण संतोष काढून घेतला
संतोष दिला संताला, पण संसार काढून घेतला
संसार दिला देवी देवतांना पण मोक्ष काढून घेतला"

म्हणजे प्रत्येकाला एक वरदान आहे, त्याचवेळी दुसरा एक नकळत शाप पण आढळतो. त्यामुळे आपल्याकडे जे आहे, त्यावर फोकस करून निर्भयपणे यशाकडे जाणे ही जीवनशैली आहे.

बहुतेक व्यक्तीला आपण इतरांपेक्षा वेगळे असावे, समाजात आपणाला इतरांपेक्षा वेगळा सन्मान मिळावा. एवढेच नाहीतर आपण समाजात विशेष व्यक्ती म्हणून जगावे असे वाटत असते. असे वाटणे स्वभाविक आहे. खरंतर प्रत्येक माणूस जन्माला येताना तो इतरांपेक्षा वेगळाच असतो. निसर्गात वाढलेले वृक्षाचे पान हे दुसऱ्या पानासारखे असत नाही व जगात जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा चेहरा हा दुसऱ्या व्यक्तीसारखा असत नाही. हे विज्ञानाने मान्य केले तरीही अनेकजण इतरांसारखे आपण असावे; यासाठी अट्टाहास करतात.

दुसऱ्यासारखे कपडे यालणे, केसापासून ते चप्पलपर्यंत आणि पंजाबी ड्रेस पासून ते लिपस्टीक पर्यंत इतरांचे अनुकरण करत असल्याचे दिसते. समोराचा बोलतो कसा, चालतो कसा, तो काय खातो, तो कोणते वाहन वापरतो, कोणता परफ्युम वापरतो, त्याचा व्यवसाय काय..? अशा एक ना अनेक बाबीचे अनुकरण करतो व त्यातच त्या व्यक्तींचे व्यक्तीमत्व कोलमडते, हे लक्षात घेतले पाहिजे.

आपण जसे आहोत तसेच रहाणे, आपली स्वत:ची स्वतंत्र जीवनशैली असणे हे जीवनाच्या प्रगतीचे खरे गमक आहे, पण आपण ते विसरतो. त्यामुळे आपली विशेष प्रगती होत नाही, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत सर्व स्तरातील मुलं एकत्रच शिक्षण घेत असतात. यात सर्वसामान्य परिवातील मुलं श्रीमंताच्या मुलाचं निरीक्षण करतात. त्यांचे कपडे, दप्तर, बुट, जेवणाचे डबे तसेच ते शाळेत कसे येतात, कशावर येतात, कसे वागतात, कसे बोलतात... या निरीक्षणातून अनुकरण करतात व तेथेच घोटाळा होतो. गरीब परिवारातील मुलांना हे सर्व सहज उपलब्ध होत नाहीत. त्यात त्यांच्या मनाचा कोंडमारा होतो. ते निराश, उदास होतात. त्यांची वाटचाल दबून सुरू होते. मग त्यांच्या मनात न्युनगंड निर्माण होतो. आपणाला काहीच नाही, आपण अभ्यास करू शकत नाही, आपण जेमतेमच आहोत व तसेच रहाणार. दुर्दैवाने ती मुलं जसा विचार करतात तसेच राहतात. या मुलात एखादा मुलगा अपवाद असतो. तो त्याच्याकडे जे कपडे, दप्तर, जेवण, पुस्तके असतात; त्याचा त्याला अभिमान असतो. तो निसंकोचपणे दररोजची वाटचाल करतो आणि स्वत:चे जीवन फुलवतो. हळूहळू वर्गात तो पहिला येतो. थोडक्यात काय तर इतरांच्या अनुकरणात ही मुलं आपले सामर्थ्य विसरतात व आपलेच नुकसान करून घेतात. लहान मुलाचे जसे तसेच समाजातील गरीब व श्रीमंत वर्ग यांच्यात अशीच अनुकरण स्पर्धा होते व त्यातच प्रगती खुंटते. म्हणून म्हटले आहे, की.. लोकांना काय आवडते याचा विचार करू नका, तुम्हाला जे वाटते ते करा. कदाचित तुमचं वाटणं हीच उद्याच्या जगाची आवड बनेल !

अनेकजण स्वत:चा काळा रंग असेलतर त्या रंगावरून निराश होतात. काहीजण जाड असतात, त्यामुळे जाड्या शरीरावरून निराश होतात. त्याप्रमाणेच उंचीवरून, आवाजावरून अशा काही ना काही व्यंगातून स्वत:ला दु:खी करून घेतात. वास्तविक पाहता अनेकांनी आपल्याला जे मिळालं त्याचं वेगळपण जाणवून घेतले. आपण इतरापेक्षा नक्कीच वेगळे आहोत हे समजून स्वत:ला विकसीत केले, कला विकसीत केली व आपले जीवन यशस्वी केलेले आहे.

मकरंद अनासपुरेच्या आवाजाची शैली वेगळीच पण तीच चित्रपटात यशस्वी ठरली. लक्ष्मीकांत बेर्डे, अशोक सराफ, भाऊ कदम, सिध्दार्थ जाधव, आनंद इंगळे, पंढरीनाथ कांबळे आदींना रूप नाही पण स्वत:तील कला प्रदर्शित करून हे लोक चित्रपटसृष्टीत पुढे आले. अमिताभ बच्चन, नाना पाटेकर यांनी स्वत:ची स्वतंत्र जीवनशैली निर्माण करून यश मिळवले. शरीराने जाड असणाऱ्या निर्मिती सावंत यांनी अनेक नाटक व चित्रपटातून यश मिळवले आहे. प्रत्येक व्यक्तीत एक टॅलेंट असते ते टॅलेंट ओळखून जो निर्भयपणे वाटचाल करतो तोच यशस्वी ठरतो.

आपण जे आहोत तेच खुलून राहण्यात आनंद असतो; पण अनेकवेळा आपण जे आहोत ते लपवतो किंबहूना दाखविण्यास उत्सुक नसतो. यातूनच आपल्या अपयशाला किंवा मानसिक रोगाला आपण आमंत्रण देतो. आपण जसे आहोत तसेच दिसावे व वागावे ही नैसर्गिक कृती आहे. यापेक्षा वेगळे आहोत असे दाखविणे व वागणे ही विकृती आहे.

याबाबतची एक कथा आहे. कावळ्याने बगळ्याला पाहिले व म्हणाला.. 'तु एवढा पांढरा शुभ्र कसा ?' त्यावेळी बगळ्याने गमंत केली तो म्हणाला.. 'मी तुझ्या सारखाच काळा होतो, पण साबण लावली की मी पांढरा शुभ्र झालो.' त्यानंतर कावळ्याने साबण लावून पांढरे होण्याचा प्रयत्न केला, पण तो होता त्यापेक्षा अधिक काळा झाला. थोडक्यात महत्वाचे म्हणजे धारण केलेले मुखवटे सोडून देणे व जसे आहोत तसे वागणे हे महत्वाचे आहे.

स्पर्धा परीक्षामध्ये हजारो मुलं मुलाखतीतून बाहेर पडतात. कारण त्यांना जे प्रश्न विचारलेले असतात, त्याला ही मुलं स्वत:चे उत्तर देत नाहीत. या उलट समोरच्याला खुश करणारी उत्तरं ते देतात आणि तिथंच त्यांची फसगत होते. ते ढोंगी असल्याचे उघड होते आणि ढोंगी माणूस कोणालाच आवडत नाही. याबाबत फुलांचा एक संवाद महत्वाचा आहे..

सदाफुली सांगते 'रूसून रूसून रहायच नसतं हसून हसून जगायचं असतं.' रातराणी सांगते आंधाराला 'याबरायचं नसतं, काळोखातही फुलायचं असतं.' गुलाब म्हणतो 'येता जाता रडायचं नसतं तर काट्यातही हसायचं असतं.' बकुळी सांगते 'सावल्या रंगानं हिरमुसायचं नसतं तर गुणांच्या गंधानं जिंकायचं असतं.' कमळ म्हणते संकटाच्या चिखलात बुडायचं नसतं, संकटाना बुडवून फुलायचं असतं.' प्रत्येक व्यक्तीला काहीना काही टॅलेंट असतेच, ते शोधण्याची गरज आहे. इतरांचे अनुकरण करत वाटचाल करणे म्हणजे स्वत:च्या पायावर दगड पाडून घेण्यासारखे आहे.

क्षेत्र कोणतेही असो, व्यक्ती कोणीही असो, व्यवसाय कोणताही असो, त्यामध्ये जीव ओतून काम करण्याची गरज आहे. प्रत्येक दिवसागणिक प्रगती केल्यानंतर मुख्य उद्दीष्ट साध्य होण्यास वेळ लागत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपण आपणच राहिले पाहिजे म्हणून सांगावेसे वाटते, की तुम्ही तुम्हीची जीवनशैली बनवा व आनंदात जीवन जगा. यश हमखास आहे, हे विसरू नका..!

## दत्तात्रय मस्तुद यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील रहिवासी व शिक्षक दत्तात्रय दशरथ मस्तुद (वय-५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी दोन मुले, सुन, नातवंडे असा परिवार आहे. मस्तुद हे पोथरे जि.प.शाळेला शिक्षक म्हणनू कार्यरत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीला अजून तीन वर्ष बाकी होते. घारगाव या मुळगावी त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

## रिटेवाडी उपसासिंचन योजनेबाबत रश्मी बागल यांनी घेतली उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसासिंचन योजनेचा सर्व्हे लवकर पूर्ण करून तातडीने काम सुरू करण्याबाबत भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल-कोलते यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. तसेच पांढरेवाडी तलावातील पाणी सीना नदी पलिकडील सात गावे व पांडे भागात सोडणे, वडशिवणे-केम उपसासिंचन योजना आणि करमाळा तालुक्यातील सिंचन योजनेबाबत बैठक बोलाविण्याची विनंती केली. यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबत लवकरच ठोस पाऊले उचलण्याचे आश्वासन रश्मी बागल यांना दिले.

करमाळा व परिसरातील त्वचा रुग्णांच्या सेवेसाठी सोलापूर येथील
डॉ. संकेत मंडलेचा
MBBS, DDV (Pune)
त्वचारोग तज्ञ
त्वचा विकार
नायटा/गजकर्ण, इसब, खरुज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरीक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या नखांचे आजार, सुरमा इत्यादी आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला.


* वेळ : प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवार : सकाळी १० ते २
संपर्क डॉ. सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पीटल समोर, करमाळा.
अपॉईन्टमेंट -मो. 9423333904

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी
# रश्मी बागल यांना विधानसभेत पाठवा : दिग्विजय बागल



करमाळा(सं.प्र.) : दुरावलेल्या सर्वांना सोबत घेऊन आगामी विधानसभा निवडणुकीस सामोरे जाण्याचा निर्धार बागल गटाने घेतला असून, करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी रश्मी बागल यांना विधानसभेत पाठवा; असे आवाहन बागल गटाचे युवा नेते व मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी केले.

वांगी नं.३ येथे मकाई कारखान्या च्या नूतन स्वीकृत संचालकांचा सत्कार व कार्यकर्ता मेळाव्यात श्री.बागल बोलत होते. पुढे बोलताना श्री.बागल म्हणाले, की आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत करमाळा तालुक्यातील अठरा पगड जाती धर्मातील बांधवांना बरोबर घेऊन लोकनेते स्व.दिगंबररावजी बागल मामा यांनी विविध विकासकामांच्या माध्यमातून सर्वांना बरोबर घेऊन सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम केले आहे. तोच वारसा पुढे रश्मी बागल व आम्ही चालवत असून करमाळा तालुक्याच्या विकासासाठी कटीबध्द आहोत. मकाई कारखाना अडचणीतून जात असताना न डगमगता संकटाला तोंड देत स्वत:ची शेती, घर गहाण ठेवून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. स्व.मामांनी उभी केलेली संस्था कधीही बंद पडू देणार नाही. प्रसंगी कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची तयारी आहे. गेल्या दहा वर्षापासून तालुक्यातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्याची सोडवणूक करण्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपल्या सर्वांच्या हक्काचा, उच्चशिक्षित, विविध प्रश्नांची जाण असलेल्या रश्मी बागल यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून त्यांना विधानसभेत पाठवावे; असेही आवाहन श्री.बागल यांनी केले आहे.

पुढे बोलताना श्री.बागल यांनी वांगी परिसरातील रस्ते, वीज, पुनवर्सन नागरी सुविधा व उजनी धरणातील पाणी व्यवस्थापन असे विविध प्रश्न सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल; असाही विश्वास दिला. यावेळी मकाईचे स्वीकृत संचालक पदी निवड झालेले गणेश तळेकर, युवराज रोकडे यांचा सत्कार दिग्विजय बागल यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, ज्येष्ठ संचालक बाळासाहेब पांढरे, बाजार समितीचे माजी सभापती प्रा.शिवाजी बंडगर, साहेबराव रोकडे, पांडूरंग जाधव, राऊकाका दोमुख, संपत देशमुख, पांडूरंग शेटे, अर्जुन तकीक, सतीश नीळ, कल्याण सरडे, लक्ष्मण महाडिक, कुलदीप पाटील, देवा ढेरे, लक्ष्मण केकान, संतोष पाटील, डॉ.विजय रोकडे, गणेश झोळ, अजित झांजुर्णे, महेश तळेकर, विलास काटे यांचेसह मकाई व आदिनाथचे संचालक व कार्यकर्ते उपस्थित होते

### बागल गटापासून दुरावलेल्यांना पुन्हा सोबत घेणार !

आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या माध्यमातून बागल गटापासून दुरावलेल्या सर्वांना पुन्हा सोबत घेऊन करमाळा तालुक्यातील रिटेवाडी उपसा सिंचन योजना, मांगी तलाव, करमाळा एमआयडीसी, वडशिवणे तलाव, उजनी जलाशयावरील पुल तसेच पाण्याचे नियोजन, सीना कोळगाव धरण, रस्ते, विकास असे विविध प्रकारचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहे. दोन महिन्यात संपूर्ण तालुका पिंजून काढणार असल्याचे दिग्विजय बागल यांनी सांगितले.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# कुंभारगाव येथे राजर्षी शाहु महाराज यांची जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : कुंभारगाव येथील शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक नानासाहेब आढाव यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना श्री.आढाव म्हणाले, की शाहुमहाराजांनी गोरगरीब व तळागाळातील लोकांपर्यंत आपले कार्य केले. कोल्हापुरात गरीब मुलांसाठी वसतिगृहे बांधली तसेच स्कॉलरशिप मिळवून दिली. त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीने घ्यावा; असे आवाहन केले. यावेळी शिक्षक जगताप सर, दवणे सर, गोसावी सर, धांडे सर, गायकवाड सर सह कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पांगरे येथील भैरवनाथचे पुजारी दिलीप गुरव यांचे निधन



करमाळा : पांगरे येथील भैरवनाथ देवस्थानचे पुजारी दिलीपकाका गुरव (वय-५५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. गावातील सर्वांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक व ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकाशाची लेझार सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
खालील सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत
डिस्काउंट
अंबारी, सुहाना, प्रविण, रामबंधू, नवजीवन हिंग, किसान, काटदरे, चिंग्ज, कुकवेल, सवई मसाले,
पारले, ब्रिटानिया, सनफिस्ट, हलदीराम चितळे, अमुल, लक्ष्मीनारायण, दावत कल्याण भेळ, सफोला,
कोलगेट, पतंजली, पेप्सोडेंट, मेस्वाक, बबुल, विको, मॅक्सफ्रेश, मेडिमिक्स, संतुर, डव्ह, मोती, लिरील
टाटा, सोसायटी, विक्रम, रेड लेबल, सह्याद्री, परिवार, नेस व ब्रु कॉफी, लिपटन ग्रीन टी व ड्रायफ्रुटस्
पॉण्डस पावडर, पॅराशुट, एचयुल, गुडनाईट, हिमालया, डाबर, गोदरेज, सर्व टूथपेस्ट व टूथब्रश
डेटॉल, हारपीक, लॉयजॉल, निरमा, रिन, टाईड, एरियल, व्हील, पितांबरी, विम, लक्स, लाईफबॉय
इंदुलेखा, सेसा, केशकिंग, नवरत्न, लॉरिअल पॅरिस, जस्मीन, व्हॅसलीन, निविया, फॉग, यार्डली, केएस
गाला, मिल्टन, ओरल बी, हगीज व सर्व बेबी प्रोडक्टस्, बेकरी, स्वीटस् व नमकीन, पुजा साहित्य इ.
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# करंजे-भालेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी प्रतिभा सरडे





करमाळा(सं.प्र.) : करंजे-भालेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी माजी आमदार जयवंतराव जगताप गटाचे कट्टर समर्थक व करंजे सोसायटी चे चेअरमन सुभाष सरडे यांच्या पत्नी प्रतिभा सुभाष सरडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. या निवडीनंतर सरपंच यांचा सत्कार ग्रामपंचायती तर्फे करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सरपंच प्रतिभा सरडे यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे आश्वासन दिले. माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी करमाळा बाजार समितीच्या कार्यालयात सरपंच पती सुभाष सरडे यांचे सत्कार केला. यावेळी दादासाहेब सरडे, जनार्दन नलवडे, सेक्रेटरी अनिल सुरवसे, प्रविण भोगे, शिवाजी जाधव, विजय जाधव, सुहास सरडे, छगन पवार, प्रदीप सरडे, एकनाथ सरडे, भाऊसाहेब सरडे, विजयकुमार सरडे, सुनील सुरवसे, विनोद फुके, प्रकाश जाधव, हनुमंत पवार आदी उपस्थित होते.

# योग हीच आरोग्यसंपन्न आयुष्याची गुरूकिल्ली : प्रा.माया झोळ



करमाळा(सं.प्र.) : सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मानवाचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून गंभीर आजारांचा त्याला सामना करावा लागत आहे. आरोग्यसंपन्न आयुष्य जगण्यासाठी योग हीच आरोग्यसंपन्न आयुष्याची गुरूकिल्ली आहे; असे मत दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव प्रा.माया रामदास झोळ यांनी व्यक्त केले.

दत्तकला शिक्षण संस्था स्वामी चिंचोली येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.झोळ बोलत होत्या. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणा सुर्यवंशी, सचिव प्रशासकीय अधिकारी डॉ.विशाल बाबर यांनी सहभागी होत योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

पुढे बोलताना माया झोळ म्हणाल्या, की स्पर्धेच्या युगात मनुष्य आपले ध्येय गाठण्यासाठी नुसता मृगजळामागे धावत सुटला आहे. यामुळे त्याचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून, आयुष्यभराची कमाई आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने दवाखान्यामध्ये घालविण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. त्यामुळे मनुष्याने आपले शरीर ही संपत्ती म्हणून त्याचे आरोग्य टिकवण्यासाठी दररोज योगा करून आपले जीवन सुखी , समृध्द संपन्न करण्याचे आवाहन केले.


# इरा पब्लिक स्कुलमध्ये शाहु महाराज जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : इरा पब्लिक स्कुल जेऊर येथे छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन करून त्यांचे शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील योगदान, अस्पृश्यता निवारण यामधील कार्य हे प्रेरणादायी असल्याचे मत आरणे मॅडम व मोहिते मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी संस्थेचे सचिव सुनील अवसरे, अवसरे मॅडम, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री गजानन अगरबत्ती


- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !






पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)



आता आपल्या **करमाळ्यात !**

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी **धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल** कोर्ट समोर, बार्शी.

# वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त सुपारीच्या २५० रोपांचे वाटप

करमाळा(सं.प्र.) : वडशिवणे येथे वडिलांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त मुलांनी ग्रामस्थांना २५० सुपारीच्या रोपांचे वाटप करून झाडे लावा-झाडे जगवा हा संदेश दिला. वडशिवणे येथील कै.ह.भ.प.पुंडलिक नामदेव जगदाळे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विश्व वारकरी संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ह.भ.प.बापूसाहेब ढगे महाराज यांचे किर्तन झाले. त्यानंतर सुपारी झाडाच्या रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप, पुणे चिंचवड येथील रोटरी क्लब ऑफ वाल्हेकरवाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप वाल्हेकर, सुभाष वाल्हेकर, सुधीर मरळ, सचिन खोले, नंदकुमार टोणपे, रोहन टोणपे, जाधव सर यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## ८ वे पुण्यस्मरण



कै.अजित गणपत बुधवंत
(मृत्यू दि.३/७/२०१६, पुण्यस्मरण दि.२६/६/२०२४)


अर्ध्यावरती डाव उधळला, ऐन तारूण्यात घाव घातला
निर्दयी तो काळ आला, आम्हा मधुनी तुज घेऊन गेला
माता-पिता, बंधू-भगिणी, मित्र परिवार सर्व गहिवरले
चैतन्याचा प्रकाश गेला

**कै.अजित गणपत बुधवंत**
यांचे ८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस
**भावपूर्ण आदरांजली !**


टीप : दि.३ जुलै रोजी कोर्टी येथील मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना मिष्टान्न वाटप

शोकाकुल
गणपत गोविंद बुधवंत (गुरूजी), किशोर गणपत बुधवंत(सर),
यश अजितकुमार बुधवंत, दादासाहेब भगवान जाधव (माजी सरपंच)
विजुभैय्या अंगारशा
**शिवनेरी क्रिडा मंडळ, रावगाव**

# शिवन्या
## आरी वर्क क्लासेस अँन्ड नथ मेकींग वर्कशॉप



**आरी वर्क करून मिळेल**
मिरर वर्क, कट वर्क,जरदोसी वर्क, कट वर्क, नेट वर्क, थ्रेड वर्क, कुंदन वर्क



**Start Business From Home**
- १ दिवस प्रोफेशनल नथ मेकींग वर्कशॉप
- नथ बनविण्यासाठी लागणारे सर्व साहित्य दिले जाईल.
- ५ नथ शिकविल्या जातील.
- वर्कशॉपची खासियत.... ब्राईडल खोपा, ए.डी.स्टोन नावाची नथ शिकविल्या जातील.
- तुम्ही बनवलेल्या सर्व नथी तुमच्याच राहतील(तुम्ही भरलेल्या फी पेक्षा जास्त किंमतीच्या असतील)
- सर्टिफिकेट व मार्केट नॉलेजमिळेल.

नवरीच्या डिझायनर ब्लाऊजच्या सर्व प्रकारच्या ऑर्डर घेतल्या जातील.

पत्ता : भोसले हॉस्पिटल शेजारी, गणेशनगर, करमाळा., जि.सोलापूर
संपर्क : मो.7350649444, 9325461744





जय महाराष्ट्र मित्र मंडळाचे संस्थापक व आमचे मित्र
मा.श्री.
# प्रविण कटारिया
व्हा.चेअरमन
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा



श्री.बाळासाहेब इंदुरे
(जय महाराष्ट्र पतसंस्था)

2 July



शुभेच्छुक
**इंदुरे परिवार, करमाळा.**





श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित
# श्री कमलादेवी कन्या विद्यालय
करमाळा, जि.सोलापूर

इ.10 वीचा निकाल 87.67 टक्के

प्रथम क्रमांक



कु.ज्ञानेश्वरी राजेंद्र वीर
(९२.६०%)

द्वितीय क्रमांक



कु.यश्वी राजेंद्र वासानी
(८९.००%)

तृतीय क्रमांक



कु.कल्याणी रामकृष्ण सपाटे
(८४.६०%)

दहावीच्या परीक्षेतील सर्व यशस्वी विद्यार्थीनी व मार्गदर्शक शिक्षकांचे
## हार्दिक अभिनंदन !


शुभेच्छुक

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था**
करमाळा, जि.सोलापूर
(अध्यक्ष व सर्व संचालक)

**श्री कमलादेवी कन्या विद्यालय**
करमाळा, जि.सोलापूर
(मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद)



माजी आमदार



युवा नेते




मार्गदर्शक



नूतन सरपंच



करंजे-भालेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी माजी आमदार मा.श्री.जयवंतराव जगताप गटाच्या समर्थक
## सौ.प्रतिभा सुभाष सरडे
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
## हार्दिक अभिनंदन !



श्री.सुभाष व्यंकटराव सरडे
(चेअरमन, वि.का.सोसा करंजे-भालेवाडी)

शुभेच्छुक
# शिवरत्न मशिनरी स्टोअर्स
कमलादेवी रोड, शाहुनगर, करमाळा. (प्रोप्रा : सरडे बंधू)
ठिबक, पीव्हीसी पाईप, इले., मोटार व शेतीसंबंधी सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण !

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स, पोंधवडी
ता.करमाळा, जि.सोलापूर

## कन्याकुमारी, मदुराई, त्रिवेंद्रम रामेश्वरम्, तिरूपती बालाजी दर्शन यात्रा



**यात्रेचे स्वरूप..**

**कन्याकुमारी :** तीन सागरांचा संगम, भव्य विवेकानंद स्मारक, नेत्रदिपक सुर्यदर्शन.
**सुचिंद्रम :** ब्रह्मा, विष्णु, महेश यांचे मंदिर, १८ फुटी हनुमान मूर्ती
**त्रिवेंद्रम :** श्री पद्मनाभम स्वामीचे भव्य असे प्राचीन मंदिर.
**रामेश्वरम :** चारधामा पैकी एक, बारा ज्योर्तिलिंग पैकी एक, बावीस कुंड स्नान, गंध माधव पर्वत, सीता कुंड, राम कुंड, धनुष्यकोडी, बिभीषण मंदिर
**तिरूपती बालाजी :** श्री तिरूपती बालाजी भारतातील सर्वात श्रीमंत देवस्थान गोविंदराज, पद्मावती दर्शन (बालाजी दर्शन पास सह)

**सहल खर्च**
प्रत्येकी **१३,८०० रू.** (४ व्यक्तींमध्ये १ रूम)
प्रत्येकी **१५,१०० रू.** (२ व्यक्तींमध्ये १ रूम)

**कालावधी : दि.२०/८/२०२४ ते दि.२९/८/२०२४ पर्यंत**

**बुकींगसाठी ॲडव्हान्स : ७००० रू.**

● चहा, नाष्टा, जेवण व उत्कृष्ट निवास व्यवस्थेसह ●


बुकिंग चालू

**सहलीसाठी सूचना...**
- ही सहल पुणे/दौंड वरून सुरू होऊन तेथेच समाप्त होईल.
- संपूर्ण सहलीच्या कालावधीमध्ये जीवित व वित्त हानी याची जबाबदारी ज्याची त्याची आहे.
- कोणत्याही कारणाने सहलीस येणे न झाल्यास ॲडव्हान्सची रक्कम परत मिळणार नाही.
- सहल मध्येच सोडल्यास स्वखर्चाने परतीचा प्रवास करावा लागेल.
- सहल खर्चामध्ये रेल्वे स्लिपरक्लास, बस प्रवास, निवास व्यवस्था, दोन वेळा चहा, दोन वेळा जेवण. १ वेळ नाष्टा असा राहिल. रेल्वे प्रवास मधील चहा, नाष्टा, जेवण यांचा खर्च स्वत: करावयाचा आहे.
- रिक्षा, प्रवेश फी, बोटींग व २२ कुंडांचे स्नान इ. खर्च स्वत: करावयाचा आहे.
- ५ ते ११ वर्षापर्यंतच्या लहान मुलांना ७०% सहल खर्च लागेल.
- पद्मनाभम स्वामी व बालाजी दर्शनासाठी महिलांनी साडी व पुरूषांनी पांढरी लुंगी परिधान करावी.
- वरील सर्व गोष्टीचा विचार करून सहलीला येण्याचे निश्चित करावे. नंतर तक्रार चालणार नाही.

खास श्रावणमासानिमित्त

## काशी दर्शन यात्रा
**काशी, गया, अयोध्या, प्रयाग**

• सहल शुल्क • रू.१५,१००० (प्रती व्यक्ती)



**आमच्या सुविधा...**
- **रेल्वे प्रवास :** ३ एसी
- **बस प्रवास :** २ x २ पुश बॅक लक्झरी कोच
- **भोजन व्यवस्था :** २ वेळा चहा, १ वेळ नाष्टा, २ वेळा शुध्द शाकाहारी भोजन
- **निवास व्यवस्था :** ४ व्यक्तींमध्ये १ रूम
  २ व्यक्तीमध्ये रूम हवी असल्यास प्रत्येकी १५०० रू. जास्तीचे लागतील.

बुकिंग चालू

**कालावधी : दि.५/८ ते दि.१३/८/२०२४ पर्यंत**

**● संपर्क : मयुर राऊत, मो.८८८८३३३६३८**

# ॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥

क्षणोक्षणी आमच्या मनी तुमची आहे आठवण
हीच आमच्या जीवनातील अनमोल आहे साठवण
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी
हीच आमची ईश्वर चरणी प्रार्थना !



स्व.प्रविणकुमार रायचंद दोशी (शेठ)
(मृत्यू दि.२६/६/२०२२)

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक
लोकनेते नारायण पाटील ग्रा.बि. सह.पतसंस्थेचे माजी चेअरमन
जैन समाजाचे माजी उपाध्यक्ष

## कै.प्रविणकुमार दोशी

यांचे द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे स्मृतीस

भावपूर्ण **आदरांजली !**

शोकाकुल

● परेशकुमार प्रविणकुमार दोशी ● डॉ.पराग प्रविणकुमार दोशी

**समस्त दोशी परिवार, जेऊर**

# रविंद्र वळेकर यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) स्थानिक स्वराज्य संस्था या पंचायत राज व्यवस्थेचा कणा आहे. ग्रामपंचायत पासून खऱ्या अर्थाने देशाच्या सर्वांगीण विकासाची सुरूवात होत असते. आपल्या गावाला आदर्श बनवण्यासाठी झटणाऱ्या सरपंच व ग्रामसेवकांचा वाटा लोकशाही मजबुत करण्यात महत्वपूर्ण आहे; असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी व्यक्त केले.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, गंजपेठ येथे राजर्षी शाहु प्रतिष्ठान, दक्ष मराठी पत्रकार संघ व जागृत शोध वृत्तपत्र यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित राजर्षी शाहू आदर्श सरपंच, आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरण प्रसंगी चाकणकर बोलत होत्या.

पत्रकार संघाचा यावर्षीचा छत्रपती शाहु आदर्श सरपंच पुरस्कार निंभोरे येथील सरपंच रविंद्र वळेकर यांना रुपालीताई चाकणकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

सरपंच वळेकर यांनी एक वर्षाच्या आत महिला सक्षमीकरण, आरोग्य स्वच्छता व बालकांसाठी पौष्टिक आहार, आरोग्य शिबीर असे अनेक उपक्रम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविले आहेत. या प्रेरणादायी कामाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. वळेकर यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार संजयमामा शिंदे, पंचायत समितीचे माजी सदस्य विलास पाटील, जि.प.चे माजी सदस्य विलास राऊत यांनी वळेकर यांचे अभिनंदन केले.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत युवा शक्ती करियर शिबीर संपन्न

करमाळा (सं.प्र.) : येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करियर शिबीर संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा व्यवसाय शिक्षक व प्रशिक्षण अधिकारी सचिन धुमाळ, यशकल्याणीचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.अॅड.बाबूराव हिरडे, ग्लोबल सायन्स अकॅडमीचे निकत, अकलुज प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य दाजी ओंभासे, संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जितेंद्र राठी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र आवाडे हे होते. यावेळी दाजी ओंभासे, डॉ.बाबूराव हिरडे,



प्रा.गणेश करे-पाटील, प्रा.निकत व सौ.निकत, सचिन धुमाळ आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सीताबाई भगवान परदेशी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका माया भागवत यांनी केले.

करमाळा शहरात प्रथम सुरू..! Reg no.42433
पाटील
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर अॅन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
● त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, अॅटी येजिंग थेरपी, मुरुम व मुरुमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
● केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे ● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

# करमाळा शहराच्या १५१ कोटी विकास आराखड्यास तांत्रिक मंजूरी : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी ८७ कोटी व रस्ते विकास ७२ कोटी असा १५९ कोटीचा करमाळा शहराचा विकास आराखडा आपण तयार केला होता. त्यास तांत्रिक मान्यता मिळाली असून पुढील प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी प्रस्ताव मंत्रायात दाखल आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याबाबत अधिक बोलताना आ.शिंदे म्हणाले, की यावर्षीच्या दुष्काळाने उजनी धरणातील वजा संख्येत गाठलेला पाण्याचा साठा व कालबाह्य झालेली करमाळा शहराची अस्तित्वातील पाणीपुरवठा योजना यामुळे या उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर झाला होता. तसेच करमाळा शहराच्या लगतचा विस्तारीत परिसरात आवश्यक पाणीपुरवठा सुविधा नव्हत्या. अशी सर्व परिस्थिती लक्षात घेता करमाळा नगरपरिषद मार्फत करमाळा शहरासाठी व शहरलगतच्या वाढता विस्तारीत परिसराकरीता अमृत २.०/महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सहभाग घेऊन सुधारीत प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांना दिल्या होत्या. तसेच करमाळा शहरांतर्गत सर्व रस्त्यांचा विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. दुष्काळात सुध्दा सुरळीत पाणीपुरवठा करमाळा शहरासाठी व्हावा; यासाठी जॅकवेल, पाणी साठवण टाकी, वितरण व्यवस्था व इतर उपकामे समाविष्ट करण्याचे सुचित केले होते. त्याअन्वये करमाळा नगरपरिषदेने या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यान्वये मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक कार्यालय पुणे मार्फत रू.८.७ कोटी ५२ लाख रकमेच्या सुधारीत पाणी पुरवठा कामास तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. या योजनेतून करमाळा शहरातील सर्व परिसराला पुढील ३० वर्षाकरीता अद्ययावत वितरण व्यवस्थेमार्फत रोज पाणी मिळणार आहे. पण त्याचबरोबर भिगवण रोडकडील शहरालगतच्या विस्तारीत परिसर मुथ्थानगर, बागवान नगर, फिरंगा?ई नगर, माने व बोकन प्लॉटिंग, तुकाराम नगर पर्यंत तर कर्जत रोड कडील जिजाऊ प्लॉटिंग पर्यंत. तसेच हिवरवाडी रोडकडील गुगळे प्लॉटिंग इंदलकर, यादव यांच्या घरापर्यंत. तसेच नगर बायपास रोड कडील मा.आ.जगताप कॉलनी, मथुरानगर, ७२ बंगले, कमलाईनगर, एसटी कॉलनी, बाजीराव नगर, सिंचननगर, करमाळा स्मार्ट सिटी परिसर, घुमरे प्लॉटिंग, राजयोग हॉटेल परिसर अशा सर्व लगतच्या विस्तारीत परिसरात नागरीकांना देखील या योजनेतून वितरण व्यवस्थेमार्फत मुबलक पाणी पुरवठा होणार आहे; असेही आमदार शिंदे यांनी सांगितले.

साई
स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

डोळ्यांचा दवाखाना
डॉ.नायकुडे यांचे
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.सौ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे. M.S.(Ayu.) Gold Medalist नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर करमाळा.मो.9834071218 / 9921013493
दवाखान्याची वेळ-सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते रात्री ९.०० पर्यंत रविवार- सकाळी १० ते दु.२ वाजेपर्यंत
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
उपलब्ध सुविधा
☛ मोतीबिंदू (Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
☛ डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
☛ Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

कुणबी नोंदी व दाखले मिळण्याची प्रक्रिया गतिमान करून

# जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ द्यावी : रश्मी बागल

करमाळा(सं.प्र.): कुणबी नोंदी व दाखले मिळण्याची प्रक्रिया गतिमान करून शैक्षणिक प्रवेशासाठीच्या जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ द्यावी; अशी मागणी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल-कोलते यांनी महसुलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की सध्या सर्वत्र विविध शैक्षणिक प्रवेशासाठीची प्रक्रिया सुरू आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केलेले आहेत. कुणबी नोंदीची प्रक्रिया ही संथगतीने सुरू असून दाखले मिळण्यास विलंब होत आहे. ही संपूर्ण प्रक्रियाच गतिमान करण्यात यावी तसेच विविध शैक्षणिक प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक असण्याचा नियम विद्यार्थ्यांना जाचक ठरत असून, जुन्या नियमाप्रमाणे



जातपडताळणी प्रस्तावाच्या पोहोच पावतीवर प्रवेश देत प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात यावी; अशीही मागणी रश्मी बागल यांनी निवेदनात केली आहे. यावेळी ना.विखे-पाटील यांनी सकारात्मक निर्णय घेऊ; असे आश्वासन दिले. यावेळी रश्मी बागल यांनी करमाळा तालुक्यातील विविध प्रश्नासंदर्भात निवेदन देऊन ते सोडविण्यासाठी ना.विखे-पाटील यांच्याशी चर्चा केली.

जनसंवाद गावभेट दौऱ्यानिमित्त पिंपळवाडी येथे कॉर्नर सभा

# शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळवून देणे हेच माझे ध्येय : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : कर्मयोगी गोविंदबापू पाटील यांचा समाजसेवा व त्यागाचा वारसा आणि वसा आमच्या रक्तात नसानसांमध्ये भीनला आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळवून देणे हेच आमचे ध्येय असून यासाठी वाटेल तेवढे कष्ट करण्याची आणि किंमत मोजण्याची माझी तयारी आहे. यामुळे आगामी काळात रिटेवाडी उपसासिंचन योजना सुरू करणारच; असे प्रतिपादन माजी आमदार नारायण पाटील यांनी केले.


जनसंवाद गावभेट दौऱ्यानिमित्त पिंपळवाडी येथे आयोजित कॉर्नर सभेत माजी आमदार पाटील बोलत होते. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक देवानंद बागल, दत्तात्रय सरडे, संजय पाटील, दादा खोमणे, अभिजीत खोमणे, सचिन पाटील, नवनाथ भारती, नितीन काळे आदी मान्यवरांसह परिसरातील नागरीक उपस्थित होते.

# करमाळा वकिल संघाच्या अध्यक्ष पदी ॲड.रविंद्र बरडे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा वकिल संघाच्या अध्यक्ष पदी ॲड.रविंद्र बरडे यांची तर उपाध्यक्ष पदी ॲड.सुनील रोकडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. करमाळा वकील संघाची वार्षिक सभा ॲड.डी.एम.सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली त्यावेळी वरील निवड करण्यात आली. यावेळी वकिल संघाच्या सचिव पदी ॲड.विनोद चौधरी, सहसचिव पदी ॲड.शेखर घाडगे व खजिनदार पदी ॲड.प्रशांत बागल यांची निवड करण्यात आली. सर्व नूतन कार्यकारिणीचे स्वागत वरीष्ठ न्यायाधी मीना एखे यांनी केले. सुत्रसंचालन ॲड.व्ही.व्ही.चौधरी यांनी केले तर आभार ॲड.जयदीप देवकर यांनी मानले.

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
**श्रीजी इस्टेट एजन्सी**
- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.



पत्ता : मेनरोड, करमाळा.

इंदापूर(जि.पुणे) येथील सुप्रसिध्द
त्वचारोग, गुप्तरोग तज्ञ
**डॉ.महेश तानाजी रूपनवर**
MBBS. DDV(Bombay)
वेळ :सकाळी १० ते ११.३०
महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शनिवारी घोलप हॉस्पिटल करमाळा, जि.सोलापूर येथे उपलब्ध !
Facilities...
- गुप्तरोग उपचार व सल्ला
- Ance(pimples) Treatment
- Ance Scar Treatment
- Melasma • Hair Loss
- Hyper Pigment Treatment
- Skin Whitening
- Under Eye Dark Circles
- Skin Tag, Wart Removel
- Dandruff Treatment
- Tatto Removel by Laser
- Fangal infection, Leprosy Psriasis, Eczema
- Unwanted Hair Removel by Laser
- Skin Glow, Polishing Skin Rejuvenation
- Anti Aging • Medicated Facial



नावनोंदणीसाठी संपर्क : मो.8483822200/9421062073

मुख्याधिकारी यांच्या अतिक्रमणधारकांना नोटीसा

# दहा दिवसात स्वत:हून अतिक्रमण काढा

करमाळा(सं.प्र.): श्रीदेवीचामाळ रोडवरील रस्त्याच्या दोन्ही बाजुने प्रचंड अतिक्रमण झाले असून नगरपालिका मालकीच्या ओपन पेसमध्ये सुध्दा अतिक्रमण करून पालिकेच्या विकास कामाला अडथळा आणला जात आहे. यामुळे रहदारीचा, वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. आता यासाठी थेट ठोस कारवाई करत मुख्याधिकारी तपासे यांनी दहा दिवसात स्वत:हून अतिक्रमण काढा अन्यथा कायदेशीर कारवाई करून अतिक्रमण काढू; अशा नोटीसा अतिक्रमण धारकांना देण्यात आल्या आहेत.

श्रीदेवीचामाळ ते आयसीआयसीआय बँक पर्यंत रस्त्याचे व गटारीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र यापुढील काम अतिक्रमण केलेल्या लोकांनी अडवल्यामुळे शहरातील वाहतूक सुरक्षितता व पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. श्रीदेवीचामाळ रोडवरील दोन्ही बाजुच्या गटारी बंद झाल्यामुळे नुकत्याच झालेल्या पावसात व्होटकर दवाखान्यासमोरील पुल पाण्याखाली जाऊन एक तास वाहतूक यंत्रणा बंद पडली होती. तसेच काही माजी नगरसेवकांनी बेकायदेशीर टपऱ्या टाकून त्या पोटभाडे कराराने दिल्या आहेत. तथाकथित स्वयंघोषित पुढारी या माध्यमातून दर महिना लाखो रुपये कमवत आहेत. दोन दिवसांपूर्वी नगरपालिकेचे कर्मचारी अतिक्रमण काढण्याच्या नोटीसा देण्यासाठी आल्यानंतर अतिक्रमणधारकांनी उलटसुलट उत्तरे देऊन कर्मचाऱ्यांना हाकलून लावले. यावर आता मुख्याधिकारी यांनी ठाम भुमिका घेऊन पोलीस संरक्षणात अतिक्रमण काढण्याची तयारी सुरू; अशी अंतिम दहा दिवसाची नोटीस अतिक्रमण धारकांना दिली आहे.




**वाशिंबेकर** सराफ अँड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ,करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३

# गोमांस विक्री करणाऱ्यांना रंगेहाथ पकडले - ५८ हजाराचा ऐवज जप्त

करमाळा (सं.प्र.) : मौलाली माळावर गोमांस कट करून विक्री करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या तिघा जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले आहे. हा प्रकार १९ जुनला दुपारी पावणेएक वाजता घडला आहे. यावेळी पोलीसांनी ५८ हजार १०० रूपयाचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार मंगेश पवार यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की बातमीदारा मार्फत करमाळा शहरात गोमांस विक्रीसाठीकापले जात असल्याची माहिती समजली. त्यानंतर आम्ही मौलालीमाळावर गेलो असता तेथे मुक्तादीर उर्फ बबलू कुरेशी (रा.श्रीगोंदा), अलपेज महंमद कुरेशी (रा.मौलालीमाळ करमाळा), शोएब कुरेशी (करमाळा) हे मांस कट करत असल्याचे दिसून आले. त्यावेळी त्यांनी जर्सी गायीची कुर्बानी करता कट केले असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांचेकडे ५७ हजार ६०० रूपयाचे २८८ किलो गोमांस आढळून आले. तसेच ५०० रूपयाचे सत्तूर व सुरे असा एकूण ५८ हजार १०० रूपयाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माहुरकर हे करत आहेत.

## सव्वापंधरा वर्षाच्या मुलीस पळवून नेले

करमाळा(सं.प्र.) : वडशिवणे येथील सव्वापंधरा वर्षाच्या मुलीस अज्ञात व्यक्तीने पळवून नेले आहे. हा प्रकार १८ जून ला घडला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, कीमाझी सव्वापंधरा वर्षाची मुलगी वडशिवणे येथे विद्यालयात दहावीच्या वर्गात शिकत होती. १८ जुनला ती शाळेत जाती म्हणून गेली त्यानंतर परत आलीच नाही. शाळेत चौकशी केली असता ती शाळेतच आली नाही; असे शिक्षकांनी सांगितले. यावरून तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

## आठ व नऊ वर्षाच्या मुलाला पळवून नेले

करमाळा(सं.प्र.) : शेलगाव (वांगी) येथील घरासमोर खेळत असणाऱ्या आठ व नऊ वर्षाच्या मुलाला अज्ञात इसमाने पळवून नेले आहे. हा प्रकार २१ जुनला सकाळी अकराच्या सुमारास शेलगाव (वांगी) येथे घडला आहे. या प्रकरणी किरण उर्फ इऱ्या भोसले (रा.शेलगाव वां.) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २१ जुनला माझा आठ वर्षाचा मुलगा व माझी नऊ वर्षाची भाची ते दोघे घराजवळ खेळत होते. त्यानंतर ते घरी आलेच नाही. शोध घेतला असता त्यांचा शोध लागला नाही. त्यांना कोणीतरी पळवून नेले आहे याची खात्री पटली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

## किरकोळ कारणावरून तरटगाव येथे जातीवाचक शिवीगाळ

करमाळा(सं.प्र.) : काहीही कारण नसताना तरूणास मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली आहे. हा प्रकार तरटगाव येथे २२ जुनला सायंकाळी साडेसहा वाजता घडला आहे. या प्रकरणी कचरू जगदाळे यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी २२ जुनला मी व माझी पत्नी संध्याकाळी शेतातून घरी येत असताना शैलेश संजय घाडगे याने जातीवाचक शिवीगाळ करून काठीने मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपअधिक्षक अजित पाटील हे करत आहेत.

## अपघातात श्रीदेवीचामाळ येथील दोघांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : कर्जत-करमाळा मार्गावर सटवाई फाट्याजवळ २६ जून रोजी झालेल्या अपघातात श्रीदेवीचामाळ येथील दोघांचा मृत्यू झाला आहे. दुचाकीला कारने जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. यामध्ये गणेश पांडुरंग बेद्रे (वय-२८) व शिवम सचिन चांदगुडे (वय-१८) अशी मयत झालेल्या दोघांची नावे आहेत. या दोघांच्या निधनाबद्दल करमाळा शहर व श्रीदेवीचामाळ परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.





**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक किसरेकर मो.९४२३५३५४४२


# जिंती येथील लॉजवर वेश्या व्यवसाय - पोलीसांची धाड

### दहा जणाविरूध्द गुन्हा दाखल, सहा महिलांना घेतले ताब्यात



करमाळा(सं.प्र.) : जिंती येथील अमोल लॉजवर सुरू असलेल्या अनाधिकृत वेश्या व्यवसाय केंद्रावर पोलीसांनी अचानक धाड टाकून दहा जणांना पकडले आहे. यात दहा जणा विरूध्द गुन्हा दाखल केला असून सहा महिलांना सुरक्षिततेसाठी ताब्यात घेतले आहे. हा प्रकार २५ जुनला पहाटे अडीच वाजता घडला आहे.

या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित चंद्रसेन शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जिंती येथील अमोल लॉजवर अवैध वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांना माहिती देऊन पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्यासह हवालदार उबाळे, पोलीस कॉन्स्टेबल श्री.जगताप, श्री.खैरे, श्री.शिंदे यांच्यासह अन्य प्रतिनिधींनी घटनास्थळी बनावट ग्राहक पाठवून पंचासमक्ष अमोल लॉजची झडती घेतली असता, येथे तीन खोल्यामध्ये वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन तरूणी व तीन तरूण आढळले. तर एका खोलीत तीन महिलांना डांबून ठेवलेले आढळून आले. यात लॉज मालक राजेंद्र मुरलीधर वाळेकर (रा.भिलारवाडी) हा पळून गेला होता. येथे सापडलेले मॅनेजर अजितकुमार शेट्टी (कर्नाटक), मॅनेजर सहाय्यक सोहेल अन्सारी (झारखंड), लॉज मालक राजेंद्र वाळेकर, ग्राहक तुकाराम गोडसे, सागर जाधव (पळसमंडल, ता.माळशिरस), अक्षय ओहोळ (पिंपळगाव, ता.दौंड), निखिल गाडेकर (राऊपिंपळगाव, ता.दौंड), महेश जाधव, गणेश जाधव व तात्या पवार (सर्व रा.निर्वांगी, ता.इंदापूर) या सर्वांच्या विरूध्द अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक विनोद घुगे हे करत आहेत.

# निंभोरे येथे किरकोळ कारणावरून दोघांकडून एकास बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : ट्रॅक्टर चालकाबरोबर का बोलता असे म्हणून शिवीगाळ केली. शिव्या का देता असे विचारले असता दोघांनी मिळून एकास लोखंडी पाईपने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. हा प्रकार २५ जुनला सायंकाळी साडेपाच वाजता निंभोरे येथे घडला आहे. या प्रकरणी जोतीराम जगन्नाथ वाघमारे (रा.निंभोरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझी पत्नी व मुलगा हे प्रकाश वाघमारे या ट्रॅक्टर चालकाशी बोलत असताना माझा भाऊ नागन्नाथ जगन्नाथ वाघमारे हा तेथे आला व शिव्या देऊ लागला. त्यावेळी मी तु का शिव्या देतो असे विचारले असता नागनाथ वाघमारे व त्याचा मुलगा सागर वाघमारे या दोघांनी लोखंडी पाईपाने मारहाण केली आहे. माझी पत्नी व मुलगा सोडविण्यास आले असता त्यांनाही शिवीगाळ केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.**

इंदापूर येथील सुप्रसिध्द
**हृदयविकार तज्ञ**
**डॉ.रोहन हेगडे** (MD Medicine, DrNB Cardiology)
हे दर मंगळवारी दुपारी ४ ते ६ या वेळेत शेलार हॉस्पिटल, करमाळा येथे हृदयविकारच्या रूग्णांची तपासणी व 2D ECHO साठी उपलब्ध असतील !
2D ECHO सुविधा आता करमाळ्यात उपलब्ध
पत्ता : सागर थिएटर रोड, शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
हॉस्पिटलसाठी नर्सिंग स्टाफ व फार्मासिस्ट पाहिजे
संपर्क : मो.नं.9922957895, 9922957915




दुध, कुल्फी, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड,पनीर, ताक, खवा, तुप, क्रीम मिळण्याचे ठिकाण
हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.९८२२५०२७००
चिवटे उपहारगृह राशिनपेठ करमाळा. मो.८८८८१४७००५


'गुणवत्तेचे माहेरघर'
विधाते
सायन्स & टेक्नॉलॉजी
क्लासेस
दहावीच्या परीक्षेत सायन्स विषयात 'विधाते क्लासेस' ची गुणवत्तेची परंपरा कायम राखणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे...
हार्दिक अभिनंदन
90 पेक्षा जास्त गुण मिळविणारे 16 विद्यार्थी
२०२३-२४ मधील विधाते क्लासेसचे गुणवंत विद्यार्थी
म.गांधी विद्यालय प्रथम(९३.८०%)
प्रणव वीर (सायन्स-९८)
आदित्य पांढरे (सायन्स-९८)
प्रज्ञा शिंदे (सायन्स-९७)
रूद्रा पुराणिक (सायन्स-९६)
अवधुत चव्हाण (सायन्स-९६)
म.गांधी विद्यालय चौथा क्रमांक (९१.२०%)
आदित्य गवळी (सायन्स-९६)
नंदन नलवडे (सायन्स-९६)
गोविंद पवार (सायन्स-९५)
स्नेहल शिंदे (सायन्स-९४)
अभिजीत कणसे (सायन्स-९४)
जान्हवी आगवणे (सायन्स-९३)
आदित्य शिंदे (सायन्स-९३)
उत्कर्ष इवरे (सायन्स-९३)
म.गांधी विद्यालय तृतीय क्रमांक (९१.६०%)
ओपल लुणावत (सायन्स-९२)
आदित्य नायकुडे (सायन्स-९२)
प्राची शिंदे (सायन्स-९०)
पृथ्वीराज पाटील (सायन्स-८९)
अक्षरा घोलप (सायन्स-८८)
संघर्षा कांबळे (सायन्स-८८)
सिध्दी सुतार (सायन्स-८८)
यशस्व गांधी (सायन्स-८८)
अदिती घोलप (सायन्स-८७)
अदिती नाळे (सायन्स-८७)
सृष्टी भोसले (सायन्स-८६)
प्रणव भोसले (सायन्स-८४)
यश दुधे (सायन्स-८३)
शर्वरी दुधे (सायन्स-८२)
प्रणव कोंगे (सायन्स-८२)
प्रतिभा चुंबळकर (सायन्स-८१)
स्वीटी कांबळे (सायन्स-८१)
संस्कृती निंबाळकर (सायन्स-८०)
शुभेच्छुक
विधाते क्लासेस
किल्ला विभाग, करमाळा., जि.सोलापूर
सौ.ज्योती विधाते (B.sc B.ed)
मो.9404880723, 7588020790